# प्रकरण - ५ वे.

## शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक तत्वज्ञान.

५.१ प्रस्तावना.

५.२ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक विचार.

५.३ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक तत्वज्ञान.

५.४ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे एक शिक्षण तज्ञ.

५.५ समारोप.

संदर्भ -

::::::::::

## ५.१ प्रस्तावना -

प्रकरण २ मध्ये बापूजींचे जीवन चरित्र थोडक्यात दिले आहे. प्रकरण ३ मध्ये महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक पार्श्वभूमीचा विचार केला आहे. प्रकरण ४ थे बापूजींच्या शैक्षणिक कार्याबद्दलच्या माहितीचे पृथःकरण व अर्थनिर्वचन केले आहे. या प्रकरणात बापूजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

शैक्षणिक तत्वज्ञानाची आवश्यकता प्रतिपादन करतांना प्राचार्य ग. वि. अकोलकर म्हणतात.

> " तत्वज्ञान हा कोणत्याही कार्याचा आधारभूत पाया असतो. कांही ठराविक तत्वाला अनुसरूनच कोणत्याही संस्थापकास शैक्षणिक कार्य करावे लागते. "१.

अकोलकरांनी म्हटल्याप्रमाणे प्रत्येक शिक्षण प्रसारकाचे शिक्षणविषयक विचार त्याच्या जीवनविषयक तत्वज्ञानावर आधारलेले असतात.

बापूजींच्या शैक्षणिक कार्याची बैठक सत्य, शील, प्रामाणिकपणा, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, त्याग आणि सेवा, या पंचशील तत्वावर आधारित अशीच होती. राजगुरु म्हणून बापूजीनी केलेल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात, सन १९४२ क्रांती लढयातील त्यांचे कार्य, तसेच एक लाख रुपये कर्मवीर गौरव निधी जमा करण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम यामधून भाऊराव पाटील यांना बापूजींच्या सत्य, प्रामाणिक, त्याग आणि सेवा, या तात्विक गुणवैशिष्ठयांचा प्रत्यक्ष आचरणातून प्रत्यय आल्यामुळे रयत शिक्षण संस्थेत त्यांनी बापूजींना प्रवेश दिला. बापूजीनी दहा वर्षे रयतशिक्षण संस्थेची त्यागी वृत्तीने सेवा केली. त्यानंतर त्यांना स्वत: शिक्षण प्रसाराचे कार्य करावे असे वाटू लागले. बहुजन समाजाची शिक्षण प्रसार या माध्यमाद्वारे सेवा करावी या विशिष्ट ध्येयाने प्रेरित होवून त्यानी श्री स्वामी विवेकानंद संस्थेची स्थापना केली.

व आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्रातील समाज जीवनावर उमटविला. बहुजन समाजावर होणा-या शैक्षणिक अन्यायाबाबत बापूजींनी आवाज उठविला. खेडयापाडयातील लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शिक्षण घेण्यास सामान्य जनतेला प्रवृत्त केले. त्यांनी केलेल्या सर्व अवाहनास व प्रयत्नास समाजाने उस्फूर्तपणे साथ दिली. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात ज्ञानदानाचे कार्य करून बहुजन समाजाची जागृती केली. म्हणूनच त्यांच्या शैक्षणिक विचारांचा मागोवा घेणे अभ्यासकाला आवश्यक वाटले.

## ५.२ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक विचार :-

बापूजींनी शिक्षण प्रसाराचे कार्य करीत असतांना कांही जीवनविषयक तत्वांचा पुरस्कार केला होता. त्या तत्वाला अनुसरून त्यांनी आपले शिक्षण विषयक विचार मांडण्याचा प्रयत्न केला.

विवेकानंद संस्थेतर्फे प्रकाशित होणा-या " संस्कृती" सन १९८५-८६ या वार्षिकात संस्थेचे सेक्रेटरी, अभयकुमार साळुंखे यांनी बापूजींच्या शैक्षणिक विचाराविषयी लिहले आहे.

१] सदवर्तनी, सुसंस्कारी, शील संपन्न समाज निर्माण व्हावयाचा असेल तर शिक्षणाची कास धरावी लागते.

२] शिक्षकांनी विचार आचाराची एक संघता ठेवावी.

३] निर्भयी स्वतंत्र बाण्याचा शिक्षकच ताठ कण्याचा नागरिक निर्माण करू शकेल.

४] संस्कारशील, ज्ञानसंवर्धन, संशोधन व आदर्शाची जोपासना करणारे शिक्षक निर्माण झाले पाहिजेत.

५] प्रत्येक विद्यार्थी मुलत: सतप्रवृत्त संवेदनाक्षम, विचारशील असतो.

६] संस्कृती संपन्न समाज हा मानवतेचा खरा आधार आहे.

७] विद्यार्थी व शिक्षकांनी लिनता चौकसपणा व सेवाभावी वृत्तीने ज्ञानार्जन करावे.

८] त्यागाशिवाय शांती नाही व त्यागानेच जग समृध्द होते.

९] मनुष्य इतर प्राण्याप्रमाणे क्षुद्र नव्हे, तर तो एक श्रेष्ठ पुरुष आहे की जो स्वत:च्या हातानी आपले आयुष्य घडवित असतो.

१०] अन्याय करणारी व्यक्ती मग स्वकीय असो वा परकीय असो तिच्याशी दोन हात करून स्वत:चा स्वाभिमान ठेवणे हेच जिवंतपणाचे खरे लक्षण आहे. "२.

अभयकुमार साळुंखे यांच्या म्हणण्यानुसार -

"संस्कार संपन्न समाज निर्मितीसाठी त्याग व सेवाभावी वृत्तीची गरज बापूजीनी प्रतिपादन केली. विद्यार्थी व शिक्षकविषयी आदर्शवादी दृष्टीकोन बापूजीनी मांडला." अन्यायाच्या बाबतीत ते म्हणत -

" अन्याय करणारी व्यक्ती कोणतीही असो तिच्याशी दोन हात करून स्वाभिमान ठेवणे हेच जीवंतपणाचे लक्षण आहे."

निरनिराळ्या व्यक्तीकडून बापूजींना मिळालेल्या प्रेरणेविषयी व त्यांच्या शिक्षण विषयक विचारावर प्रकाश टाकताना-

प्राचार्य जे. बी. कुंभार"बापूजी साळुंखे : एक चैतन्यमय व्यक्तीमत्व" ९ जून १९८८ या दैनिक सह्याद्रितील लेखामध्ये लिहतात की,

"बापूजी नेहमी कृतज्ञतेने म्हणत - ज्योतीरावानी मला समाज सुधारणेचा कानमंत्र दिला. स्वामी विवेकानंदामुळे माझ्या कार्याला तात्विक अधिष्ठान प्राप्त झाले. संत गाडगे बाबानी अस्पृश्यता निवारण्याची दीक्षा दिली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडून शिक्षण प्रसाराची प्रेरणा मिळाली. शाहू छत्रपतीच्या स्फूर्तीवर माझा बंडखोरीचा पिंड पोसला. आणि गांधीजींच्या सत्य अहिंसेने मी राष्ट्र कार्याकडे वळलो." ३.

'चांगले काय, वाईट काय ही जाणण्याची पात्रता शिक्षणाने निर्माण झाली पाहिजे, असे बापूजीचे शिक्षणविषीचे मत होते. यावरून सुसंस्कारी समाज निर्मितीसाठी शिक्षण आवश्यक आहे. त्यामुळे संस्कार संपन्न समाज हा मानवतेचा आधार होवू शकेल असे त्यांचे मत होते. त्यासाठी त्याग, सेवाभावी वृत्तीची गरज बापूजीनी प्रतिपादन केली. त्यागानेच जग समृध्द होईल असे मत मांडले.

विद्यार्थ्यांविषयी ते म्हणत " विद्यार्थ्यांनी लिनतेने व चौकसपणाने ज्ञानार्जन करावे" तसेच शिक्षकाविषयी ते म्हणत " शिक्षकाने आचारविचारात एक संघता ठेवली तर ते आदर्श नागरीक घडवू शकतील.

अन्यायाच्या बाबतीत ते म्हणत " अन्याय करणारी व्यक्ती स्वकीय असो परकीय असो तिच्याशी दोन हात करून स्वाभिमान ठेवणे हेच जिवंतपणाचे लक्षण आहे.

जोतीराव फुले, स्वामी विवेकानंद, संत गाडगे बाबा, भाऊराव पाटील, महात्मा गांधी इत्यादी व्यक्तीकडून मिळालेल्या प्रेरणेविषयी बापूजी कृतज्ञता व्यक्त करतात.

चांगले काय वाईट काय हे जाणण्याची पात्रता व माणसाचा सर्वांगीण विकास शिक्षणाने होईल असे बापूजींचे शिक्षणविषयक विचार होते असे दिसून येते.

## ५.३ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक तत्वज्ञान.

बापूजींच्या शिक्षणाचे तत्वज्ञान त्यांची व्यवहारिक दृष्टी, त्यांनी शिक्षण प्रसारासाठी केलेला त्याग यामध्ये दिसून येते. जीवनाला उपयोगी पडेल अशाच तत्वज्ञानाचा बापूजींनी पुरस्कार केला. जीवनात तत्वज्ञानाची आवश्यकता स्पष्ट करतांना म.बा कुंडले लिहतात.

> तत्वज्ञान हे सत्याचा शोध घेऊन त्याच्या प्रकाशात जीवनाचे साफल्य कशात आहे समजावून सांगते. जीवनविषयक मुल्ये निश्चीत करते. तत्वज्ञान आपल्या समोर उच्च व उदात्त आदर्श ठेवते.--योग्य काय अयोग्य काय याचे स्पष्टीकरण करते."४

म्हणून प्रत्येकाच्या जीवनात तत्वज्ञानाचे अधिष्ठान आवश्यक आहे. तसेच तत्वज्ञान मनुष्याला जीवनाचा अर्थ, जीवनाचे प्रयोजन काय? हे समजून घेण्यास मदत करते.

शैक्षणिक तत्वज्ञानाचे विवरण करतांना प्राचार्य ग. वि. अकोलकर म्हणतात.

> " शैक्षणिक तत्वज्ञानाच्या विवरणाचे केंद्रस्थान केंहीत केंद्रस्थान कांही-तरी ज्ञान ग्रहण हेच असले पाहिजे. "५.

शिक्षण व तत्वज्ञान यांचा परस्पर संबंध स्पष्ट करतांना श्री. म. ब. कुंडले यांनी आपल्या "शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र " या पुस्तकात स्पष्ट केले आहे की, " सरजॉन डयूईच्या मते शिक्षणातून तत्वज्ञान आकारास येते. शैक्षणिक सिध्दांताचे सर्वसामान्य स्वरूप म्हणजेच तत्वज्ञान. "६.

वरील सर्व विचारवंतानी तत्वज्ञानाची पार्श्वभूमी स्पष्ट केली आहे. या तत्वज्ञानाची छाप बापूजींच्या विचार सरणीवर पडली असल्याने त्यांनी आपल्या विचाराचा संबंध शिक्षणातील संस्कार प्रक्रियेशी जोडलेला दिसून येतो. त्यामुळे बापूजींच्या शैक्षणिक विचाराना तत्वज्ञानाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

" ज्ञान, विज्ञान, सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार " हे शैक्षणिक तत्वज्ञान संस्थेच्या ध्येय वाक्यातून बापूजीनी मांडले.

स्वामी विवेकानंदाच्या तात्विक विचारांचा बापूजींच्यावर प्रभाव पडला होता असे प्रश्नावली व मुलाखती मधून बहुसंख्य प्रतिसादकांनी सांगितले.
" शिक्षण म्हणजे पूर्णत्वाचा अविष्कार, जीवनाची घडण, चारित्र्य संवर्धन या विवेकानंदाच्या तात्वीक विचाराचे साधर्म्य बापूजीनी ख-या अर्थाने आपल्या शिक्षण प्रसार कार्यातून साधले. विद्यार्थ्यांच्या जीवनाची घडण त्यानी वसतिगृहातून घडविली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची तयारी ते स्वत: करून घेत. त्या दृष्टीने बापूजींची वसतिगृहे म्हणजे जीवन शिक्षण केंद्रेच आहेत. श्रमसंस्कार, तत्वाचे संवर्धन शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्ञान विज्ञान यांचे ज्ञान अपार आहे. ते एकसारखे विकसीत होत असते. त्यात नवीन भर पडत असते. या नवीन विषयाचे ज्ञान शिक्षणाचा प्रसार विस्तृत प्रमाणात झाल्यानेच साध्य होईल. त्यासाठी शिक्षण प्रसाराची आवश्यकता बापूजीनी प्रतिपादन केली. विद्यार्थ्यामध्ये सुसंस्कार घडविण्यासाठी त्यांनी सत्य, चारित्र्य ,प्रामाणिकपणा, पिळवणूकीस आळा, त्याग आणि सेवा ही तत्वे शिक्षण प्रसार कार्यातून राबविली. विद्यार्थ्यामध्ये शिस्त निर्माण होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. श्रम प्रतिष्ठा या तत्वाचा पुरस्कार केला.

सर्व प्रकारचे शिक्षण सार्वत्रिक कसे करता येईल याची व्यवहारिक उकल त्यानी विविध स्तरावर केलेल्या शैक्षणिक प्रयोगातून दिसून येते. त्यासाठी त्यांनी सार्वत्रिक शिक्षण या तत्वाचा पुरस्कार केला. बापूजींचे शैक्षणिक तत्वज्ञान केवळ पुस्तकी स्वरूपाचे नव्हते. त्यांचा जीवनाशी प्रत्यक्ष संबंध होता. भाऊरांवाच्या कडून " कमवा व शिका " या योजनेची प्रेरणा घेतली आणि ही योजना संस्थेच्या विविध शाखातून राबविण्याचा शैक्षणिक प्रयोग त्यांनी केला. बापूजींच्या शैक्षणिक प्रयोगांचा व तत्वज्ञानाचा उगम तत्कालीन परिस्थितीतून झाला आहे. बापूजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करताना डॉ. एस्. एस्. भोसले लिहतात.

> "बहुजन समाजात तीव्र ज्ञान लालसा निर्माण करणे. कुणाची लाचारी न पत्करता मनगटाच्या जोरावर काम करून स्वयंभूपणे शिक्षणातून स्वत:चा विकास साधणे. जाती भेदातीत वसतिगृहाच्या माध्यमातून सामाजिक एकता साधणे हे कार्य बापूजीनी केले. "७.

## ५.४ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे एक शिक्षण तज्ञ-

बहुजन समाजावर होणा-या अन्यायाबाबत बापूजीनी आवाज उठविला. अन्याय निवारण्यासाठी बापूजीनी विविध प्रयत्न केले. शाहू महाराज, महर्षि आण्णासाहेब कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण प्रसार कार्याचा आदर्श बापूजीनी डोळ्यासमोर ठेवला होता. वसतिगृहाच्या माध्यमाद्वारे त्यांनी सामाजिक एकता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी एकाच वसतिगृहात निरनिराळ्या जातीच्या मुलाना प्रवेश दिला. प्रसंगी वसतिगृहातील मुलांच्या स्वयंपाकाचे व जेवण वाढण्याचे काम स्वत:च्या पत्नी सुशिलाबाईच्या कडून करून घेतले. आबासाहेब कांबळे नावांच्या मागासजातीच्या विद्यार्थ्याला वसतिगृहात स्वत:च्या मुलाप्रमाणे वाढवून त्याला एम्. बी. बी. एस्. चे शिक्षण घेण्यास सहाय्य केले. या उदाहरणावरून जातीभेद नसावा याबाबतची त्यांची पुरोगामी वृत्ती व वेगळेपण दिसून येते. जातीभेद घालविण्यासाठी संस्थेमध्ये नोकरी भरती करताना निर-निराळ्या जातीच्या लोकांना संधी दिली.

समाजातील अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी विविध उपाय योजिले.

हर्बर्ट स्पेन्सर, रूसो, जॉन डयूई, स्वामी विवेकानंद इत्यादी शिक्षण तज्ञांचे विचार माहित करून घेण्याचा प्रयत्न बापूजींनी १९४५ मध्ये बी.टी. शिकत असताना केला. स्वामी विवेकानंद च्या मानवतावादी शिकवणुकीचा प्रभाव त्यांच्यावर पडला. शिवाय मुळातच त्यांच्या श्रध्दाळू व भक्तीमार्गी स्वभावामुळे त्यांची दृष्टी दीन दुबळ्या बहुजन समाजाची सेवा करण्याकडे वळली. स्व अनुभवास बापूजी फार महत्व देत. प्राप्त स्थितीत आपणच मार्ग शोधला पाहिजे. व्यवहारात जीवनाला जे उपयोगी तेच खरे तत्वज्ञान होय अशी बापूजींची धारणा होती.

त्यासाठी बापूजींनी " ज्ञान विज्ञान सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" या ब्रीद वाक्याचा अर्थ विशद करताना सांगितले- " ज्ञान म्हणजे सत्य, शीलता, प्रामाणिकपणा, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, त्याग आणि सेवाया पंचशील तत्वांचे ज्ञान. या तत्वाचे आचरण म्हणजे विज्ञान या ज्ञान विज्ञानामुळे माणूस सुसंस्कारी होतो."

हे तत्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारात म्हणजे शिक्षण प्रसार कार्यामधून त्यांनी उपयोगात आणले. प्रत्यक्ष कृती करतांना गरजेनुसार त्यात बदल केले. त्याबाबत चिंतन केले. स्वांतत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन यासारख्या राष्ट्रीय दिन कार्यक्रमातून विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करण्याचा कृतीतून प्रयत्न केला. बापूजी भक्तीमार्गी असल्याने प्रत्येक समस्येवर चिंतन करून त्यांनी तत्वज्ञान मांडले. स्वत: केलेल्या प्रयोगातून जावून सुलाखून आलेला विचार सांगणारे ते शिक्षण तज्ञ होते. याबाबत डॉ. आप्पासाो. पवार व प्राचार्य सी.आर. तावडे यांनी दिलेल्या बापूजी विषयीच्या अभिप्रायाचा उल्लेख करताना संभाजीराव पाटणे म्हणतात.

> " बापूजी एक शिक्षण तज्ञ ह आहेत. त्यांनी कर्तव्यनिष्ठा त्याग सत्वशिलता या तत्वांचा अंगिकार केला होता. "८.

## ५.५ समारोप -

निरनिराळ्या विचारवंतानी मांडलेल्या तत्वज्ञानाची छाप बापूजींच्या विचार सरणीवर पडली असल्याने त्यानी आपल्या विचाराचा संबंध शिक्षण प्रक्रियेशी कसा जोडला व शिक्षण प्रसार कार्य करीत असताना त्यांच्या विचाराना तत्वज्ञानाचे स्वरुप कसे प्राप्त झाले. या संबंधीचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेतला आहे.

बापूजी साळुंखे हे एक शिक्षणप्रसारक होते. त्यांचे शैक्षणिक कार्य या पार्श्वभूमीवर महत्वाचे आहे. ते पुढील प्रकरणात दिले आहे.

::::::::::::

## संदर्भ


१] ग. वि. अकोलकर : शिक्षणाची आधुनिक तत्वज्ञाने. पुणे श्री विद्या प्रकाशन, १९७१, पृष्ठ क्र. ९.

२] अभयकुमार साळुंखे : "संस्कृती" [ सन ८५-८६ अंक ४ था ] कोल्हापूर, श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे प्रकाशन १९८५ पृष्ठ क्रमांक १८.

३] जे. बी. कुंभार : दैनिक सह्याद्रि, ९ जून १९८८. कोल्हापूर सह्याद्रि प्रकाशन, १९८८, पृष्ठ क्रमांक २.

४] म. बा. कुंडले : शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र पुणे, विद्या प्रकाशन, १९७३ पृष्ठ क्रमांक-३७.

५] ग. वि. अकोलकर : उपरनिर्दिष्ठित पृष्ठ क्रमांक-२९५

६] म. बा. कुंडले : उपरनिर्दिष्ठित पृष्ठ क्रमांक-४०

७] एस्. एस्. भोसले : महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा कोल्हापूर, बापूजी साळुंखे षष्ठ्यब्दिपूर्ती समिती १९८०, पृष्ठ क्र. ६२७.

८] संभाजीराव पाटणे : "शिक्षण महर्षि बापूजी" सातारा सुशिल प्रकाशन १९७७, पृष्ठे क्रमांक ३३, ३४.


: : : : : : : : : : : :